Tweet 0

## कार्यशाळा : पुणे बार असोसिएशनच्या उपक्रमात तज्ज्ञांचे मार्गदर्शन

# वकिलांनी गिरवले न्यायवैद्यकशास्त्राचे धडे

**पुणे : न्यायवैद्यक** शास्त्राच्या अहवालाकडे न्यायालय अत्यंत विश्वासार्ह पुरावा म्हणून पाहते; त्यामुळे वकिलांनी खटला चालविताना पॉलिग्राफ चाचण्या, मानसशास्त्रीय चाचण्या, हस्ताक्षर व आवाजाचे नमुने यांच्या अहवालाची जास्तीत जास्त मदत घ्यावी, असे आवाहन न्यायवैद्यक तज्ज्ञांनी केले.



**न्यायवैद्यकशास्त्र कार्यशाळेत उपस्थित वकिलांना मार्गदर्शन करताना दीप्ती पुराणिक.**

पुणे बार असोसिएशनच्या वतीने आज वकिलांकरिता 'न्यायवैद्यकशास्त्र कार्यशाळे'चे आयोजन करण्यात आले होते. न्यायवैद्यक तज्ज्ञ दीप्ती पुराणिक, तितिक्षा देसाई, योगेश सोनवणे, प्रकाश भोसले यांनी या वेळी मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे उद्घाटन ॲड. सुरेशचंद्र भोसले, ॲड. औदुंबर खुने-पाटील यांच्या हस्ते झाले. या वेळी पुणे बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र उमाप उपस्थित होते.

दीप्ती पुराणिक म्हणाल्या, ''मानशास्त्रीय चाचण्यांचा चांगला उपयोग खटला चालविताना करुन घेता येऊ शकेल. त्यामध्ये पॉलिग्राफ चाचणी, लाय डिटेक्टर टेस्ट करून घेता येऊ शकतात. रक्तदाब व तणाव यांच्या आधारे या चाचण्यांचे निष्कर्ष काढले जातात.''

तितिक्षा देसाई यांनी सह्या, हस्ताक्षर यांच्या चाचण्या कशाप्रकारे उपयुक्त ठरु शकतील, याची माहिती दिली. नुकतीच एका सिनेअभिनेत्रीने केलेल्या आत्महत्येच्या प्रकरणात तिने लिहिलेल्या सुसाईड नोटचे नमुने न्यायवैद्यकशास्त्राच्या मदतीने तपासण्यात आले. त्याचा चांगला उपयोग खटल्यामध्ये होऊ शकेल. न्यायवैद्यक शास्त्राच्या माध्यमातून सह्यांची तपासणी कशी केली जाते, याची माहिती देसाई यांनी या वेळी दिली. विविध खटल्यांमध्ये आवाजाचे नमुने तसेच व्हिडीओ चित्रीकरणामध्ये झालेले फेरफार कशा पद्धतीने शोधून काढले जातात. मोबाईल फोन व ई-मेलद्वारे संगणकातून काढून टाकलेला डाटा पुन्हा परत कसा मिळविला जातो, याची माहिती योगेश सोनवणे यांनी दिली. ॲड. अमोल जाधव यांनी सूत्रसंचालन केले. ॲड. अतिष लांडगे यांनी आभार मानले. कार्यकारणी सदस्य ॲड. संयोगिता पागे या वेळी उपस्थित होत्या. (प्रतिनिधी)